
Indian Streams Research Journal
ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार आणि वर्तमानातील वास्तव : एक दृष्टिकोन

प्रा.डॉ.राजकुमार खंडू मस्के
विभागप्रमुख, पदवी व पदव्युत्तर , मराठी विभाग, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर.

## प्रस्तावना

डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक महन ज्ञानकोश. शिक्षण, समाज, संस्कृती, राजकारण, अर्थकारण, परराष्ट्र धोरण, शेती, कामगार, स्त्रिया, शेतकरी; अशा अनेकविध विषयांवर कठोर भाष्य करणारे व्यासंगी विद्वान म्हणून ते संपूर्ण विश्वात ख्यातकीर्त आहेत. अस्पृश्य, शोषित, उपेक्षितांचे मुक्तिदाते, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व न्यायाचे पुरस्कते आणि त्यासाठी लढणारे सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व. श्रद्धा, शील, समर्पणाचे नाव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आहे. कर्ते सुधारक, प्रज्ञावंत लोहपुरुष, प्रतिभासंपन्न लेखक, स्वाभिमानी व दूरदृष्टीचे राजकारणी, शिक्षणक्षेत्रातील पदव्यांचे एव्हरेस्ट शिखर, शीलवंत संस्थाचालक, आदर्श पालक, विवेकी वक्ते, प्रकांड पांडित्य, अचाट बुद्धीमत्ता आणि कणवाळू लोकसेवक म्हणून त्यांचे नाव जगातील दीन-दलितांनी आपल्या काळजावर कोरून ठेवले आहे. घटनेच्या शिल्पकारापासून ते भारताच्या भाग्यविधात्यापर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरकच आहे. मुला-मुलींचे शिक्षण, पालकांची भूमिका, विद्यापीठ शिक्षणाचे ध्येय, दलितांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणे, विद्येबरोबरच



शीलाचे महत्त्व, विद्यार्थ्यांना दिलेला संदेश, उच्च शिक्षणाचा आग्रह, विद्या, प्रज्ञा, करुण, शील व मैत्री ही विद्यार्थ्यांची पंचतत्त्वे म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण व समाजाविषयीचे विचार वाचलं म्हणजे त्यांचे द्रष्टेपणच प्रत्ययास येते. परंतु त्यांच्या त्यागाप्रमाणे नि:स्पृह कार्यकर्ते, सामाजिक बांधिलकीचे भान असलेले अधिकारी, विनम्र विद्यार्थी अल्प प्रमाणातच दिसून येतात. बाबासाहेबांचे शैक्षणिक विचारकार्य आणि आजच्या काळाची तुलना करीत असताना मन अस्वस्थ होते. सदरील विषयाच्या अनुषंगाने माझे अवलोकन मी खालीलप्रमाणे मांडतो आहे.

## विद्यापीठ शिक्षणाबाबतची भूमिका :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची विद्यापीठाच्या शिक्षणाच्या ध्येयासंबंधी विशिष्ट भूमिका होती. विद्यापीठ हे फक्त परीक्षा घेणारी यंत्रणा नसावी, तर शैक्षणिक कार्य करणारी व्यवस्था असावी. विद्यापीठातील दिल्या जाणाऱ्या शिक्षणाविषयी ते म्हणतात, “विद्यापीठात दिले जाणारे शिक्षण समाजाभिमूख असावे, ते विज्ञाननिष्ठ आणि पक्षपात विरहीत असावे. कोणत्याही विशिष्ट समाजघटकाच्या हितसापेक्ष नसावे. शिक्षणाचा उद्देश वस्तुस्थितीपूरक माहिती पुरविणे किंवा काही सिद्धांत शिकविणे हा नसावा, तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होईल, त्यांच्या मानसिक, बौद्धिक क्षमतांची वाढ होईल, प्रस्थापित अधिकारी, विद्वानांच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण करण्यास ते समर्थ होतील.”[१] वर्तमानातील विद्यापीठ परीक्षा घेणारी यंत्रणा बनली आहे. परीक्षा घेणे व पदवी देणे ह्या चक्राच्या बाहेर विद्यापीठ येत नाहीत. विद्यापीठातून मिळणारे शिक्षण समाजाभिमूख, विज्ञाननिष्ठ आहे काय? पक्षपात किंवा विशिष्ट समाजाचे हीत साधावे असेच आचरण जातदांडग्यांचे आहे. विद्यापीठातून पदवी घेतलेला विद्यार्थी हा संशोधक, समाजाभिमूख की, समाजविन्मुख? ज्या जातीत जन्मला त्यात अडकणारा किंवा तो स्वांतसुखाय मनोवृत्तीचा बनत चालला आहे. विद्यापीठातून चालणारे प्रशासन सम्यक दृष्टीचे अभावानेच असते. विद्यापीठातून जात जाळणारे जहाल जाज्वल्य निष्ठेचे तत्वशील तरूण तयार न होता जात जपणारे आणि बुझ्वां मनोवृत्तीचे नागरिक तयार होत आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एकारलेल्या पद्धतीनेच विकास होत आहे. गुणावगुणांचे विश्लेषण, सत्यासत्याची कठोर परीक्षा करणारा, स्वीकार, नकारातील विवेकाचे भान आणि अधिकारी वर्गाच्या विचारांवर भाष्य करणारे विद्यार्थी साधारणच आहेत. “सध्या ज्या प्रकारचे विद्यार्थी विद्यापीठातून शिक्षण घेवून बाहेर पडतात, त्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन केले तर विद्यापीठ शिक्षण ध्येयपूर्ती आणि

कार्यप्रवणता या दृष्टीने संपूर्णपणे अयशस्वी ठरले आहे असे दिसते.''[२] विद्यार्थी आणि गुणवत्ता यांचा सुतराम संबंध दिसून येत नाही, असे म्हणता येणार नाही; पण गुण आणि गुणवान, मूल्यांचे महत्त्व जाणणारा विद्यार्थी लाखात एखादाच सापडतो. पालक, पाल्य, संस्थाचालक, आचार्य यांना विद्यार्थ्यांनी गुणवान होण्यापेक्षा मार्कवान होणे उत्तम वाटत आहे. मार्कांच्या मागे लागलेल्या शैक्षणिक केंद्रांनी परीघाला वेडच लावले आहे. परीघाकडून सगळे केंद्राकडेच पळत आहेत. तिथे पोळते, पैसा जातो. कुटुंबाच्या सुखाला परिघातले लोक पारखे होतात; पण त्यांचे केंद्राचे आकर्षण कमी होत नाही. हाजारातले काहीजण शिखराला पोहोचतात, बाकीचे काय करतात, त्याचे स्पष्टीकरण केंद्राकडे अथवा पॅटर्नवाल्या शैक्षणिक भांडवलदाराकडे नसते. पोपट तयार करणारे पॅटर्न, शिक्षणाचा धंदा करणारे संस्थाचालक, नोकरीत असूनही खासगी क्लासेस घेणारे धनवेडे आचार्य आणि मृगजळामागे धावणारे पालक, नियंत्रण ठेवणारी करप्ट व्यवस्था, हे आजच्या शिक्षणाचे दाहक वास्तव आहे. विद्यापीठामधून होणारे संशोधन, लाखोंचे अनुदान, पगारावर होणारा खर्च यातून समाजाला होणारा फायदा किती? याचा हिशोब घेतला, तर हाती मोती कमी अन् माती अधिक असे चित्र आहे.

### असा असावा प्रोफेसर :

प्रोफेसर कसा असावा? ह्या प्रश्नाचे मी उत्तर असे देईन की, प्रोफेसर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखा असावा; त्यांचे दिसणं, असणं, बोलणं, वागणं हे पारदर्शी, जिवंत होते. आजचं चित्र कसं आहे? विद्यापीठ असो की महाविद्यालय, प्रोफेसरांकडे पाहिल्यानंतर विद्यार्थ्यांना आळसाने करकचून मीठी मारावी असेच वास्तव आहे. मोजके प्रोफेसर सोडले तर मोठा ठणठणपाळच आहे. विद्यापीठात कमी अन् फक्त स्वत:ला फायदा होईल अशा व्याख्यानात अधिक व्यस्त असणे, विद्यापीठात, परिषदांत, परिसंवादात, पेपरांत, पुरवणीत वावर असतो. प्रोफेसरांच्या अॅकॅडमिक अचिव्हमेंटचे अभिनंदनच करायला हवे; परंतु त्यांच्या सोशल कमीटमेंटच्या दुष्काळाच्या झळा कातडं आणि आतडं करपावणाऱ्या आहेत. जी गत विद्यापीठातील प्रोफेसरांची तिच; किंबहुणा अधिक बिकट अवस्था महाविद्यालय व विद्यालयातील अध्यापकांची आहे. हल्ली 'अेपीआय' वादी प्रोफेसरांची मांदियाळी दिसते आहे. विद्यार्थी आणि समाजाच्या कल्याणाचा 'अेपीआय' वाढविण्यात गुंतलेले थोर आचार्य किती? भौतिक सुविधांच्या सुखात राहणारे 'गुरू' जनतेपासून दूर चालले आहेत. शैक्षणिक कार्यापेक्षा अशैक्षणिक कार्यातच गुरू रममाण झाल्याचे दिसते आहे. बाबासाहेब म्हणतात, ''माझे तर असे मत आहे की, प्रोफेसरांनी अध्ययनाच्या आणि अध्यापनाच्या कामी स्वत:ला इतके वाहून घ्यावे की आपल्या घराकडे बघायला त्यांना मुळी सवडच मिळता कामा नये. ते काम संपूर्णपणे त्यांच्या पत्नीवरच सोपविण्यात आले पाहिजे. प्रोफेसर लोकांनी भलतीसलती कामे अंगावर घेऊन आपल्या जबाबदाऱ्यांचे क्षेत्र उगाच वाढवित जावे ही गोष्ट मला मान्य नाही. अध्ययन व अध्यापन यामध्ये संशोधनही आलेच. या तीन गोष्टीखेरीज प्रोफेसरांनी दुसरे कोणतेही काम करता कामा नये.''[३] बाबासाहेबांच्या आचार्यांबद्दलच्या अपेक्षा भारताचे भविष्य उज्ज्वल करणाऱ्या आहेत; मात्र आपल्या शिक्षकधर्माला अधर्माची जोड देणारे धनवेडे दादासाहेब हल्ली वाढत असल्यामुळे प्रत्येक क्षेत्राला वाळवी लागली आहे. वेतन वाढले; पण वर्तमानात (नैतिक) वाढ होत नाही. हाडाचा प्रामाणिक प्रोफेसर-शिक्षकच मनातला अंधार मिटवून प्रकाश पाडू शकतो. जगात आपल्या देशाचे नाव करणारे विद्यार्थी घडवू शकतो.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आजचा विद्यार्थी :

माणसाच्या मूलभूत गरजा तीन आहेत अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या गरजांबरोबरच 'शिक्षण' ही मूलभूत गरज मानली पाहिजे. जगण्यासाठी व जिवंत राहाण्यासाठी अन्न, इज्जतीचे रक्षण व्हावे म्हणून वस्त्र, सुरक्षेसाठी व विश्रांतीसाठी निवारा; पण ह्या गरजांबद्दल विवेक बाळगला नाही, तर माणसं पशूवत वागतात. माणूस सुखी तेव्हाच राहातो, जेव्हा त्याला शहाणपण असते. श्रद्धा, सद्भाव, सत्शीलता शिक्षणामुळेच येते. शिस्त, सेवा व संयम शिकविते, सुसाट धावणाऱ्या मनावर नियंत्रण ठेवण्याचे काम शिक्षण करते. विद्यार्थ्यांच्या मन, मनगट आणि मेंदूला, तसेच अन्य इंद्रियांवर नियंत्रण ठेवते त्याला शिक्षण म्हणतात. विद्यार्थ्यांमधील सुप्तगुणांना चेतविते ते शिक्षण होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर शेवटपर्यंत विद्यार्थी होते. सतत शिकतो, तो विद्यार्थी. सत्य, शिव आणि सुंदराची पारख करण्याची दृष्टी देते ते शिक्षण. शिक्षण हा संस्कार असतो. शिक्षण नसणे म्हणते माणूस जिवंत असून मेल्यासारखा असतो. दलितांचे सवर्णांनी अज्ञानामुळेच अमानुषतेने शोषण केले, यासाठीच त्यांनी अस्पृश्यांसाठी शिक्षणाची सोय करून दिली. मिलिंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले, ''विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री या पंचतत्त्वानुसार मिलिंद महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याने आपलं चारित्र्य बनविलं पाहिजे आणि या मार्गाने एकट्यानेच जावे लागले तरी मनोधैर्य व निष्ठ राखून गेले पाहिजे.''[४] विद्येबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये प्रज्ञा, शील, करुणा असावी लागते. विद्येच्या जोडीला करूणा नसेल, तर, शील नसेल तो विद्यार्थी आणि कसाई यात काहीच फरक नसतो. मिलिंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची ही पंचतत्त्वे होत. महाविद्यालयांनी ह्याच पंचतत्त्वांचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. शिक्षणाचा आणि शीलाचा अतुट संबंध असावा लागतो. शिक्षण हे शस्त्र प्रज्ञाशून्य माणूस अमानुषपणे माणसांवरच चालवेत; पण प्रज्ञावंत माणूस शिक्षणाचा उपयोग संरक्षण व इतरांच्या कल्याणासाठी करेल.

महाविद्यालयाचा हेतू कोणता असावा, हेच बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्यातून शिकण्यासारखे आहे. आजच्या संस्थाचालकांचा हेतू 'धन कमावण्याची दुकाने' असा झाला आहे. महाविद्यालयांमधून पदांची भरती करताना 'जात' हा घटक अत्यंत प्रभावी ठरत आहे. शिक्षणाची ठेकेदारी करणाऱ्यांनी सिद्धार्थ व मिलिंद महाविद्यालयाच्या उद्देशांचे अवलोकन करायला हवे.

विद्यार्थी कसा असावा, तर तो विद्रोही, विनयी, समाजाच्या वेदना जाणणारा संवेदनशील हवा. सिद्धार्थ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उपदेश करताना बाबासाहेब तळमळीने म्हणतात, "आजकालच्या विद्यार्थ्यांमुळे माझी पूर्णपणे निराशा झाली आहे ! माझा त्यांचा निकटचा संबंध आला खरा पण त्यांना कशाचीही आस्था वाटत नाही, हे मला कळून चुकले आहे. आपल्या देशात पूर्वी असा एक काळ होऊन गेला की, त्यावेळी रानडे, गोखले, टिळक, सर फिरोजशहा मेहता व त्यांच्यासारखे आणखी कितीतरी आस्थेवाईक व अत्यंत कळकळीचे विद्यार्थी निर्माण झाले. त्यांच्यामध्ये आस्था होती, उमेद होती, शिस्त होती. आपल्या अंगावर एक प्रकारची जबाबदारी आहे. याचीही त्यांना पूर्णपणे जाणीव होती. पण आजकालच्या विद्यार्थ्यांमध्ये ही जाणीव किंवा शिस्त मुळीच नाही."[५] आजच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये जबाबदारीची जाणीव नाही, शिस्त नाही, सौजन्य नाही.

व्यवहारी जगाच्या मोहात आजचा विद्यार्थी अडकला आहे. आडात चंगळवाद असेल तर पोहऱ्यात चिंतन येणार कोठून? आदर्श शोधूनही जर सापडत नसतील, तर विद्यार्थ्याने भागविलासात रमण्याचे ठरविले, तर तो त्याचा गुन्हा नाही. विद्यार्थ्याला घडविणाऱ्या गुरूचा व समकालीन परिस्थितीचा तो दोष आहे, असे म्हणावे लागेल. आजचा विद्यार्थी शिकतो; पण शहाणा होत नाही, तो नोकरी करतो (आरक्षणामुळे), संसार करतो; पण समाजाला विसरतो. शिक्षण, संघटन, संघर्ष व समंजसपणा आजच्या विद्यार्थ्यांत कमी होत चालला आहे. संधीसाधूपणा, तर किळस यावा इतका वाढला आहे. नोकरी नाही लागली तर राजकारण किंवा विद्यार्थी दशेतच राजकारणाला सुरूवात करणे अर्धवट शिक्षण सोडून संघटनेचा, समाजाचा शिडी म्हणून वापर करून सत्तेला जाणे व स्वतः श्रीमंत होणे, ही आजच्या दलित व दलितेतर तरुणांची खास वैशिष्ट्ये दिसून येत आहेत. काही तरुण आपण भले व आपला अभ्यास भला ह्या वृत्तीने शिक्षण पूर्ण करून आरक्षणाचा लाभ घेत स्वतःचेच कल्याण करून घेतात अशा समाजविन्मुख तरुणांचा मोठा गट दलितांबरोबरच सर्व जाती-धर्मात आहे. १२ डिसेंबर १९३८ रोजी मुंबई अस्पृश्य विद्यार्थी संमेलनास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संबोधीत केले, "तुम्ही घाणीत पडलेली रत्ने आहात. अत्यंत घाणेरड्या पाण्यात अत्तराचा थेंब पडावा त्याप्रमाणे तुमची स्थिती आहे. तुमच्या आईबापांना शिक्षण नाही. अठराविश्वे दारिद्र्य. तेव्हा हा मैला साफ करणे हे तुमचे कर्तव्य आहे."[६] तरुण विद्यार्थ्यांवर बाबासाहेबांचा विश्वास होता. तरुण दलित समाजाला तारू शकतो; यासाठीच हे आत्मीयतेने त्यांना उपदेश करतात. आजच्या तरुणांनी बाबासाहेबांच्या उपदेशाप्रमाणे आचरण केले, तर स्वतःबरोबर समाज आणि राष्ट्राचेही भले होणार आहे.

### शिक्षणाचा उपयोग कशासाठी ?

शिक्षणाचा उपयोग कशासाठी व कोणासाठी करावा? आपल्याला शिकण्यासाठी ज्यांनी मदत केली, त्यांना आपण विसरायचे की स्मरायचे व त्यांना सढळ हाताने मदत करायची? नोकरीला लागलेला दलित माणूस व सवर्ण माणूस नोकरी मिळाल्यानंतर कमालीचा घरकोंबडा होतो. स्वतःच्या गावाला, वस्तीला, समाजाला विसरण्याचे हल्ली तुफान जोरात सुटले आहे. शिकलेल्या लोकांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग दुर्बलांसाठी करणे गरजेचे असते; पण तसे होत नाही, "आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्याच दीनदुबळ्या जनतेच्या उद्धारार्थ न करिता जर शिकून आपली नोकरी भली आहे. आपली बायकामुले भली या भावनेने आजचे शिकलेले तरुण वागणार असले तर ह्यांचा समाजाला काय उपयोग?"[७]

तरुणांनी व नोकरदारांनी आपल्या कर्तव्याला विसरू नये. मला इतरांनी मदत केली आहे. मी इतरांना मदत केलीच पाहिजे, ह्या जाणिवेने शिकलेले तरुण वागले, तर समाजाचा उद्धार होणे शक्य आहे. नोकरीत आलेल्या दलितांनी आपली आडनावं बदलली.

"आरक्षणाच्या सवलतीने ते साहेब झाले
साहेबांनी ताबडतोब आडनाव बदलले
साहेब सवर्ण झाले
शहरातील श्रीमंत वस्तीत त्यांनी घर मिळविले
गावाचा, वस्तीला त्यांना विसर पडला
साहेब स्वतःलाही विसरले
मला वाईट याचे वाटले
माणसात ज्यांनी आणलं
प्रतिष्ठा ज्यांनी दिली
ज्यांमुळेच माडी अन् गाडी मिळाली
त्या भीमालाच ते विसरले

असले वागणे कोणत्या जातीचे
चौका-चौकात सत्कार करावेत ह्या डोमकावळ्यांचे''

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवन हे शिक्षणच आहे; त्यांची प्रत्येक गोष्ट शिकण्यासारखी आहे. वक्तृत्व, विनय, विद्रोह, व्यासंग, समर्पण, शील घेण्यासारखेच आहे. आज समाजातले शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक वातावरण समाधानकारक नाही. आजच्या काळाने अटळ आव्हाने उभी केली आहेत. दलित, उपेक्षित, वंचित, आदिवासी, बहुजनांच्या मूलभूत गरजा व प्रश्नांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करून, त्यांच्या अस्मितांना अत्यंत्यिक टोकदार केले जात आहे, भावनाशील बनविले जात आहे. सर्व पीडक संघटित तर पीडित विस्कळीत व्हावेत; अशी व्यवस्था निर्माण केली जात आहे. चर्चा निष्फळ, चिकित्सा नको, विभूतीपूजा, तात्काळ क्षणिक लाभ, चिंतनाचे झरेच आटत चाललेले, चेतनावनीवरच सारा भर, सगळी ओढ राजकीय सत्तेचीच, प्रशासकीय सत्तेच्याबद्दलची जागरूकता नसणे, सुशिक्षितांची बेकारी, केवळ स्वार्थासाठी संघटनेत केलेली फाटाफूट आणि फंदफितुरी, जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली आव्हाने इत्यादी कारणांमुळे दलितांच्या चळवळी थंडावल्या, सुस्थितीतील दलितांची आत्ममग्नता व श्रद्धेचा स्वहितार्थ वापर, ही आजच्या दलितांच्या व तत्सम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक चळवळीतील प्रदुषणं आहेत, ''बाबासाहेबांनी दलितांच्या उत्थानासाठी शिक्षणाला गुरूकिल्ली मानले. अर्थात शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा त्यांचा मूलमंत्र आपण विसरलो. खरे तर बाबासाहेबांनी बौद्ध धम्म स्वीकारून ऐहिक व आध्यात्मिक जीवन सुधारण्यासाठी मध्यममार्ग निवडला. बौद्ध धम्माचा गाभा बौद्धिक विकासाचा अव्हेर करून तृष्णा क्षय करणे हा आहे.''[८] शेवटी काही निष्कर्ष हाती आले ते पुढीलप्रमाणे - (१) शिक्षणातून विद्यार्थी चिकित्सक दृष्टीचा बनावा. (२) विद्यापीठ केवळ परीक्षा घेणारे नसावे; पण वर्तमान विद्यापीठं परीक्षा घेणारी व जातदांडग्यांचे मोठे अड्डे बनत चालले आहेत. (३) आजचा विद्यार्थी बांधिलकीचे भान विसरत चालला आहे तो शिक्षणाचा उपयोग स्वतःच्या भल्यासाठी करीत आहे. (४) प्रोफेसर 'अेपीआय' च्या चक्रात पूर्ण अडकला आहे. (५) शिक्षण वाढले; पण संघटन नि संघर्ष संपला आहे. (६) सम्यक दृष्टी देणारे शिक्षण आवश्यक आहे. (७) बाबासाहेबांचा शैक्षणिक विचार विश्वातील सर्वांना उपयुक्त ठरणारा आहे.

**संदर्भ :**

(१) आंबेडकर डॉ.भीमराव, दलितांचे शिक्षण, पृ.३३
(२) तत्रैव, पृ.३४
(३) तत्रैव, पृ.१८७
(४) तत्रैव, पृ.२४६
(५) तत्रैव, पृ.१८३
(६) तत्रैव, पृ.१५१
(७) तत्रैव, पृ.१५६
(८) देसरडा एच.एम., दै.लोकमत दि.१२.४.०१७ पृ.८